**RNI No. MAHENG /2009/35528**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ११, अंक ३६] बुधवार, ऑक्टोबर १, २०२५/आश्विन ९, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ८१

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्राख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

**INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, dated the 1st October 2025.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2025.**

*AN ORDINANCE*
*further to amend the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017.*

**WHEREAS** both Houses of the State Legislature are not in session ;

**AND WHEREAS** the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017, for the purposes hereinafter appearing ;

Mah. LXI of 2017.

**NOW, THEREFORE,** in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) (Amendment) Ordinance, 2025.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of section 1 of Mah. LXI of 2017.

**2.** In section 1 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section (*3*),— Mah. LXI of 2017.

(*1*) in clause (*a*), for the word "ten" the word "twenty" shall be substituted;

(*2*) in clause (*b*), for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

Amendment of section 6 of Mah. LXI of 2017.

**3.** In section 6 of the principal Act, in sub-section (*1*), for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

Amendment of section 7 of Mah. LXI of 2017.

**4.** In section 7 of the principal Act,—

(*1*) in sub-section (*1*),—

(*a*) for the word "ten" the word "twenty" shall be substituted;

(*b*) in the first proviso, for the word "ten" the word "twenty" shall be substituted;

(*2*) in sub-section (*2*), for the word "ten" the word "twenty" shall be substituted;

(*3*) in the marginal note, for the word "ten" the word "twenty" shall be substituted.

Amendment of section 12 of Mah. LXI of 2017.

**5.** In section 12 of the principal Act,—

(*1*) for the word "nine" the word "ten" shall be substituted;

(*2*) for the word "five" the word "six" shall be substituted;

(*3*) the existing proviso shall be deleted.

Substitution of section 14 of Mah. LXI of 2017.

**6.** For section 14 of the principal Act, the following section shall be substituted, namely :—

Spread-over in establishments.

"**14.** The spread-over of a worker in the establishment shall not exceed twelve hours in any day.".

Amendment of section 15 of Mah. LXI of 2017.

**7.** In section 15 of the principal Act, for the words "one hundred and twenty-five hours" the words "one hundred and forty-four hours" shall be substituted.

## STATEMENT

The State of Maharashtra is India's most economically dynamic State which accomodate enormous industrial and service sectors employing large number of workers. It is an endeavour of the State to reduce compliance burden for small businesses for promoting economic growth while ensuring continued protection for workers under various labour laws. The regulatory reforms in operational flexibility and reduction in compliance burden will eventually lead to economic growth of the State.

2. To align with the reform of regulations and procedures related to Ease of Doing Business and Ease of Living it is considered necessary to reduce the compliance burden on smaller establishments. It is also considered necessary to provide operational flexibility of working hours without changing the fixed limit of weekly forty-eight hours of work. For the above purposes, the Government considers it expedient to amend the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017( Mah. LXI of 2017), suitably.

3. The salient features of the proposed amendments are as follows, namely :—

(*a*) to increase threshold limit of 10 or more employees to 20 or more employees in any establishment for registration and other regulatory provisions of the said Act in order to reduce compliance burden for smaller businesses, encourage job creation and eliminate the fear of non-compliance. Establishments with less than 20 workers will no longer need a registration certificate from the Facilitator but they will only need to provide an intimation of their business. However, the other statutory protections to their workers remain the same;

(*b*) to increase the daily hours of work from the existing nine hours upto ten hours, inclusive of rest intervals, subject to a maximum of forty-eight hours in any week. This measure aims to create greater economic activity, enhance employment opportunities and give establishments the flexibility to handle emergencies, peak demand or staff shortages without disruption;

(*c*) to extend the spread-over of working hours from the existing ten and a half hours to twelve hours in a day to accommodate the increased daily working hours and to provide greater scheduling in establishment;

(*d*) to increase the maximum continuous working hours without a rest interval from five to six hours, to provide flexibility and smoother adjustments to the daily maximum hours of work;

(*e*) to increase overtime period within quarter from 125 hours to 144 hours so that establishments will be allowed to engage workers in overtime for an increased period per quarter to address exceptional work pressure. This change will increase workers' earning potential and formalize overtime practices, ensuring that all additional hours are properly recorded and compensated, which will help in preventing exploitation of workers. However the overtime working will not be mandatory for the workers.

4. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 28th September 2025.

ACHARYA DEVVRAT,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

I. A. KUNDAN,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक २२] बुधवार, ऑक्टोबर १, २०२५/आश्विन ९, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**—महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व शेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | पृष्ठे १-४ |


**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १ ऑक्टोबर २०२५.

**MAHARASHTRA ORDINANCE No.VIII OF 2025.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.

**सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

२०१७ चा महा.६१. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे, प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १ मधील, पोट-कलम (३) मध्ये,- २०१७ चा महा.६१.

(१) खंड (क) मधील, "दहा" या मजकुराऐवजी, "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) खंड (ख) मधील, "दहापेक्षा" या मजकुराऐवजी, "वीसपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "दहा" या मजकुराऐवजी, "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये,-

(१) पोट-कलम (१) मधील,-

(क) "दहापेक्षा" या मजकुराऐवजी, "वीसपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पहिल्या परंतुकामधील, "दहा" या मजकुराऐवजी, "वीस" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मधील, "दहापेक्षा" या मजकुराऐवजी, "वीसपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) समास टीपेमधील, "दहापेक्षा" या मजकुराऐवजी, "वीसपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये,-

(१) "नऊ" या मजकुराऐवजी, "दहा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) "पाच" या मजकुराऐवजी, "सहा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) विद्यमान परंतुक वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १४ ऐवजी दाखल करणे.

**६.** मुख्य अधिनियमातील कलम १४ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईलः-

आस्थापनांमधील कार्यकालयोजन.

"**१४.** आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन, कोणत्याही दिवशी बारा तासांपेक्षा अधिक असणार नाही.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मध्ये, "एकशे पंचवीस तासांपेक्षा" या मजकुराऐवजी, "एकशे चव्वेचाळीस तासांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र राज्य हे, भारतातील सर्वाधिक गतिमान अर्थव्यवस्था असलेले राज्य असून, त्यामध्ये, मोठ्या संख्येत कामगार काम करीत असलेली मोठ्या प्रमाणातील औद्योगिक व सेवा क्षेत्रे समाविष्ट आहेत. विविध कामगार कायद्यांन्वये कामगारांचे संरक्षण कायम ठेवण्याची सुनिश्चिती करत असतांना, आर्थिक विकासाला चालना देण्याकरिता छोट्या व्यवसायांवरील अनुपालनाचा भार कमी करण्यासाठी राज्य प्रयत्नशील आहे. कार्यान्वयन लवचिकता व अनुपालनाचा भार कमी करण्यासंबंधीच्या विनियामक सुधारणांमुळे राज्याची आर्थिक वाढ होईल.

२. व्यवसाय सुलभता व जीवन सुलभता याच्याशी संबंधित असणारे विनियम व कार्यपद्धती यांच्या सुधारणेशी अनुरूप, छोट्या आस्थापनांवरील अनुपालनाचा भार कमी करणे आवश्यक आहे असे वाटते. आठवड्यातील कामाच्या अठ्ठेचाळीस तासांच्या निश्चित मर्यादेत बदल न करता, कामाच्या तासांच्या कार्यान्वयन लवचिकतेची तरतूद करणे आवश्यक आहे असे देखील वाटते. वरील प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) यात यथोचित सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

३. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) छोट्या व्यवसायांचा अनुपालनाचा भार कमी करण्याच्या, रोजगार निर्माण करण्यास प्रोत्साहन देण्याच्या आणि अनुपालन न केल्याची भीती दूर करण्याच्या दृष्टीने, नोंदणीसाठी व उक्त अधिनियमाच्या इतर विनियामक तरतुदींसाठी कोणत्याही आस्थापनेतील १० किंवा त्यापेक्षा अधिक असलेली कर्मचाऱ्यांची मर्यादा, २० किंवा त्यापेक्षा अधिक वाढविणे. २० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांनी, सुविधाकारांकडून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची गरज असणार नाही, परंतु त्यांनी केवळ त्यांच्या व्यवसायाची माहिती देणे गरजेचे असेल. तथापि, त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या इतर वैधानिक सुरक्षा कायम राहतील;

(ख) दैनंदिन कामाचे तास, कोणत्याही आठवड्यात जास्तीत जास्त अठ्ठेचाळीस तासांच्या अधीन राहून, विश्रांतीच्या मध्यंतरासह, विद्यमान नऊ तासांवरून दहा तासांपर्यंत वाढविणे. मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार कार्ये निर्माण करणे, रोजगाराच्या संधी वाढविणे आणि कोणत्याही अडथळ्यांशिवाय, आपत्कालीन परिस्थिती, अधिकतम मागणी किंवा कर्मचाऱ्यांची कमतरता या बाबी हाताळण्यासाठी आस्थापनांना लवचिकता देणे, ही, या उपाययोजनेची ध्येये आहेत;

(ग) आस्थापनेमध्ये दैनंदिन कामाचे तास वाढविल्यामुळे आणि वेळापत्रक अधिक लवचिक ठेवण्याकरिता, कामाच्या तासांचे कार्यकालयोजन, एका दिवसामधील सध्याच्या साडेदहा तासांवरून बारा तासांपर्यंत वाढविणे;

(घ) कामाच्या दैनंदिन कमाल तासांमध्ये लवचिकता आणण्यासाठी आणि त्यांचे सुलभपणे समायोजन करण्याकरिता, अखंड कामाच्या तासांची कमाल मर्यादा, विश्रांतीच्या मध्यंतराशिवाय, पाच तासांवरून सहा तासांपर्यंत वाढविणे;

(ङ) एका तिमाहीतील अतिकालिक कालावधी, १२५ तासांवरून १४४ तासांपर्यंत वाढविणे, जेणेकरून अत्यंतिक कामाचा ताण कमी करण्याकरिता आस्थापनांना, प्रत्येक तिमाहीतील वाढविलेल्या कालावधीसाठी कामगारांना अतिकालिक कामात गुंतविण्याची मुभा असेल. या बदलांमुळे, कामगारांची अर्थार्जन क्षमता वाढेल आणि अतिकालिक कामाच्या पद्धतीस औपचारिक स्वरूप देता येईल आणि सर्व अतिरिक्त तासांची योग्य प्रकारे नोंदणी करण्यात येत आहे आणि त्याबद्दल भरपाई दिली जात आहे याची खात्री करता येईल. त्यामुळे, कामगारांच्या पिळवणुकीस प्रतिबंध करण्यास मदत होईल. तथापि, अतिकालिक काम करणे कामगारांवर बंधनकारक असणार नाही.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा, अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २८ सप्टेंबर २०२५.

**आचार्य देवव्रत,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आय. ए. कुंदन,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.